आर.सी.सी. ८४/२०२३
निशाणी २१

# दोषारोप

**मी, अनंत रा. टेंगसे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट नं. २, अकोले, याद्वारे तुमच्यावर आरोप निश्चीत करत आहे की,**

तुम्ही आरोपी

१. **सिताबाई गणपत काळे,**
वय – ४५ वर्ष,

२. **गणपत लहानु काळे,**
वय – ५८ वर्षे,

३. **विशाल गणपत काळे,**
वय – ३१ वर्षे,
सर्व आरोपी रा. बहीरवाडी,
ता. अकोले, जि. अहमदनगर.

**वर खालीलप्रमाणे दोषारोप ठरविण्यात येतो की,**

तुम्ही आरोपींनी संगनमताने दिनांक २९.११.२०२२ रोजी दुपारी ०१:३० वाजताचे सुमारास बहिरवाडी, ता. अकोले, जि. अहमदनगर येथे आरोपी क्र. ३ याने फिर्यादीस लाकडी काठीने पाठीवर व पोटावर मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत केलीत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३२४ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

दुसरे असे की वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक जखमी केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ३२३ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला

आहे.

तिसरे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीकडून सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा अथवा अन्य गुन्हा घडावा या उद्देशाने तिला जाणीवपुर्वक शिवीगाळ करुन शांततेचा भंग करण्यास उद्युक्त केलेत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०४ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

चौथे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी देवून फौजदारीपात्र धाकदपटशा दिलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

पाचवे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे गळ्यातील सोन्याची पोत तसेच कानातील तोडून नुकसानीस कारणीभूत ठरलात आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम ४२७ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा केला आहे.

शेवटचे असे की, वर नमुद दिवशी, वेळी आणि ठिकाणी तुम्ही आरोपींनी संगनमताने इच्छापुर्वक गुन्हा करतेवेळी वापरलेले हत्यार लाकडी काठीची विल्हेवाट लावलीत आणि त्याद्वारे तुम्ही **भारतीय दंड संहिता कलम २०१ सहकलम ३४** नुसार माझ्या न्यायीक कार्यक्षेत्रामध्ये दखलपात्र गुन्हा

केला आहे.

आणि याद्वारे मी तुम्हांस असे निर्देश देतो की, तुमचे विरुध्द सदर आरोपांखाली खटला चालविला जाईल

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.03 18:08:59 +0530

दिनांक ०३.०२.२०२६ **( अनंत रा. टेंगसे )**
अकोले
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट, नं. २ अकोले.

सदरील दोषारोपातील मजकुर आरोपींना त्यांचे भाषेत समजावुन सांगीतला.

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.02.03 18:09:04 +0530

दिनांक ०३.०२.२०२६ **( अनंत रा. टेंगसे )**
अकोले
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट, नं. २ अकोले.